# मंत्रिमंडळ निर्णय

## ८ नोव्हेंबर २०१६

## ( बैठक क्र. १०५ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | शासकीय कला महाविद्यालयांच्या अध्यापकांना द्विस्तरीय व त्रिस्तरीय वेतनश्रेणी | उच्च व तंत्र शिक्षण |
| २ | सर ज.जी. कला, उपयोजित व वास्तुशास्त्र महाविद्यालयांना स्वायत्तता | उच्च व तंत्र शिक्षण |
| ३ | विविध प्रवर्गासाठी पाण्याचे क्षेत्रीय वाटप निश्चित<br>बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांच्या मंजुरीसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापण्याचा निर्णय | जलसंपदा |
| ४ | प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळांमार्फत<br>सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी पाणीपट्टीची रक्कम वापरण्यास मान्यता | जलसंपदा |
| ५ | राज्यस्तरीय सिंचन प्रकल्पांच्या व्याप्तीतील बदलाबाबतच्या धोरणात सुधारणा | जलसंपदा |
| ६ | सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर १४ जिल्ह्यांत सघन कुक्कुट विकास गट | पदुम |
| ७ | गावांच्या शाश्वत विकासासाठी 'स्मार्ट ग्राम' योजनेस मान्यता | ग्रामविकास |
| ८ | महानगरपालिका क्षेत्रांमध्ये महिलांसाठी तेजस्विनी बस | नगरविकास |

## शासकीय कला महाविद्यालयांच्या अध्यापकांना द्विस्तरीय व त्रिस्तरीय वेतनश्रेणी

राज्यातील कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि अधिव्याख्याता यांना अनुक्रमे द्विस्तरीय आणि त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामुळे शासनावर ३.५० कोटी रूपयांचा आर्थिक भार येणार आहे.

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कला महाविद्यालयातील अध्यापकांना राज्य शासकीय कर्मचारी किंवा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे आश्वासित प्रगती योजना किंवा शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांप्रमाणे द्विस्तरीय आणि त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू नव्हती. आता मात्र १२ व २४ वर्षांची नियमित अर्हताकारी सेवा पूर्ण केलेल्या अध्यापकांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. ही वेतनश्रेणी १ जानेवारी १९८६ पासून चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार लागू करण्यात आली आहे, मात्र त्याचा प्रत्यक्ष लाभ हा निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून देण्यात येणार आहे. तसेच या दरम्यानची कोणतीही थकबाकी देण्यात येणार नाही.

१ जानेवारी १९८६ ते १० नोव्हेंबर १९९३ पर्यंत अधिव्याख्याता, प्राध्यापक या पदांसोबत सहाय्यक अधिव्याख्याता हे पदही कार्यरत होते; १९९३ मध्ये त्याचे रूपांतर अधिव्याख्यातामध्ये करण्यात आले आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार अधिव्याख्यात्याची वेतनसंरचना १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४००, वरिष्ठ वेतनश्रेणी १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ८००० तर निवडश्रेणी १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ८६०० (केवळ १० टक्के पदांसाठी) आहे. तर प्राध्यापकांसाठी १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ८००० तर वरिष्ठ वेतनश्रेणी १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ८६०० (केवळ १० टक्के पदांसाठी) अशी वेतनसंरचना आहे. वरिष्ठ व निवड श्रेणीसाठीच्या पात्रतेसाठी अधिव्याख्याता आणि प्राध्यापकांना शासनाने विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

---------------------------------------------------------------

**सर ज.जी. कला, उपयोजित व**
**वास्तुशास्त्र महाविद्यालयांना स्वायत्तता**

मुंबई येथील सर ज. जी.कला महाविद्यालय, सर ज.जी. उपयोजित महाविद्यालय आणि सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय या तिन्ही शासकीय संस्थांना स्वायत्तता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे कला क्षेत्रात देशात नामांकित असलेल्या या शिक्षण संस्थेला विविध उद्योगांशी समन्वय साधून व्यवसायाभिमुख, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करणे सुलभ होणार आहे.

जगभरातील शिक्षण व्यवस्थेत आणि त्यांच्या अभ्यासक्रमात बदत होत आहेत. त्यामुळे जुने व पारंपरिक शिक्षण अपुरे पडत असल्याने जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी तसेच सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी या संस्थांना प्रशासकीय, आर्थिक व शैक्षणिक स्वायत्तता देणे गरजेचे होते. यामुळे संस्थांना विविध उद्योगांशी समन्वय साधून व्यवसायाभिमुख, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करणे सुलभ होणार आहे.

या शासकीय संस्थेस स्वायत्तता मिळाल्यानंतर संस्था नोंदणी अधिनियम-१८६० अंतर्गत तसेच सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम-१९५ अंतर्गत संस्थेची नोंदणी करावी लागणार आहे. संपूर्ण स्वायत्तता देताना केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार संस्थेच्या व्यवस्थापकीय व प्रशासकीय संरचनेत बदल करावे लागणार आहेत. त्यानंतर त्यांच्यासाठी स्वतंत्र नियामक मंडळाची (Board of Governance) निर्मिती करावी लागणार आहे.

मंडळाचे अध्यक्ष हे दृश्यकलेतील नामांकित कलाकार किंवा नामांकित कला शिक्षणतज्ज्ञ किंवा नामांकित वास्तुशास्त्रज्ञ किंवा वास्तुशास्त्रातील नामांकित शिक्षणतज्ज्ञ असतील. त्याचबरोबर विविध क्षेत्रातील नामांकित नियामक मंडळावर नेमणूक करण्यात येणार आहे. हे नियामक मंडळ संस्थेतील अभ्यासक्रमाच्या दर्जाबाबात, तेथील सोयी-सुविधा आदींबाबत शैक्षणिक मंडळ, विषय मंडळ, परीक्षा मंडळ, अर्थ समिती, खरेदी समिती, इमारत व बांधकाम सिमिती स्थापन करून त्यांच्या शिफारशीनुसार निर्णय घेईल.

-----------------------------------

जलसंपदा विभाग

<u>विविध प्रवर्गासाठी पाण्याचे क्षेत्रीय वाटप निश्चित</u>

## बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांच्या मंजुरीसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापण्याचा निर्णय

विविध प्रवर्गासाठी पाण्याचे क्षेत्रीय वाटप (Sectoral Allocation) निश्चित करण्याच्या निर्णयासह प्रकरण परत्वे बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

सन २०११ या वर्षी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मध्ये कलम १६ (क) नव्याने अंतर्भूत करण्यात आले आहे. कलम १६ (क) १ मध्ये विविध प्रवर्गासाठी पाण्याचे क्षेत्रिय वाटप राज्य मंत्रिमंडळ स्तरावरून करण्याची तरतूद आहे. मात्र, त्यानुसारची कार्यवाही अद्याप झालेली नसल्याने सध्या बिगर सिंचनाचे पाणी आरक्षण प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केले जातात. त्यामुळे या प्रस्तावांच्या मंजुरीस होणारा विलंब टाळण्यासाठी पूर्ण झालेल्या, प्रगतीपथावरील आणि नियोजित सिंचन प्रकल्पातील पाण्याचे विविध प्रवर्गासाठी क्षेत्रीय वाटप निर्धारित करण्यात आले. त्यानुसार पिण्यासाठी १५ टक्के, उद्योगांसाठी १० टक्के आणि सिंचनासाठी ७५ टक्के असे वाटप निश्चित करण्यात आले. मात्र, शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत दिलेली बिगर सिंचनाची आरक्षणे अबाधित राहतील.

या क्षेत्रीय वाटपाची मर्यादा प्रमाणशीर (Proportionate) बाष्पीभवन व्ययासह राहणार आहे. तसेच तुटीच्या वर्षात सर्व प्रवर्गामध्ये पाणी वापराच्या प्रमाणात तूट विभागली जाईल. मात्र, असे करताना पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक पाणी वापरासाठी जास्तीत जास्त कपात अनुक्रमे २५ टक्के व ५० टक्के एवढीच करता येईल. या क्षेत्रीय वाटपाचे पुनर्विलोकन तीन वर्षानंतर करण्यात येणार आहे. क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावास मान्यता देण्याचे अधिकार आता महामंडळास देण्यात आले आहेत.

क्षेत्रीय वाटपापेक्षा जादा होणारे वैयक्तिक, ग्रामपंचायती, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, कटक मंडळ, सहकारी गृहनिर्माण संस्था व शिक्षण संस्था यांच्या पिण्याच्या पाण्याचे आणि सुक्ष्म व लघु उद्योगांचे औद्योगिक पाणी वापराच्या प्रस्तावांना जलसंपदा मंत्र्यांच्या स्तरावरून मंजुरी देण्यात येणार आहे. या संस्थांना त्यांच्या प्रस्तावानुसार दिले जाणारे पाणी वगळून क्षेत्रीय वाटपापेक्षा जादा होणाऱ्या पिण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावांना मंत्रिमंडळ उपसमितीच्या स्तरावरून मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी जलसंपदा मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग मंत्री, कृषी मंत्री, जलसंधारण मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री आणि नगरविकास राज्यमंत्र्यांची समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीचे सदस्य सचिव म्हणून सचिव (ज.सं.व्य. व ला.क्षे.वि.) हे काम पाहणार आहेत. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकांना वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी निमंत्रित असतील.

-------------------

प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळांमार्फत

## सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी पाणीपट्टीची रक्कम वापरण्यास मान्यता

राज्यातील सिंचन प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीसाठीच्या अपुऱ्या निधीमुळे निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षमता यात निर्माण होणारी तफावत दूर करण्यासाठी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळांमार्फत करण्यासह प्रकल्पाच्या सिंचन व्यवस्थापनासाठी पाणीपट्टीची रक्कम खर्च करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील सिंचन प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष होणारे सिंचन यामध्ये ३० टक्के म्हणजे १०.५० लाख हेक्टर एवढी तफावत आहे. यामागचे मुळ कारण सिंचन प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध होणारा अपुरा निधी आहे, हे लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिंचन प्रकल्पांच्या पाणीपट्टीतून जमा होणाऱ्या रक्कमेतूनच त्या प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती करण्यात यावी, असे सूचविले होते. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील नव्या सिंचन प्रकल्पांची बांधकामे पाटबंधारे महामंडळाद्वारे केली जातात. तसेच पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन, देखभाल, दुरुस्ती यासाठीही स्वतंत्र कार्यालये आहेत. सध्या प्रचलित असलेल्या कार्यपद्धतीनुसार या सिंचन प्रकल्पातून मिळणारी पाणीपट्टीची रक्कम शासनाकडे जमा केली जाते, तर या प्रकल्पांच्या देखभाल-दुरुस्ती व आस्थापना खर्चासाठी शासन स्तरावरुन योजनेतर अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. सिंचन प्रकल्पांसाठी प्राप्त होणारे हे अनुदान प्रत्यक्षात या प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी अपेक्षित असणाऱ्या खर्चाच्या तुलनेत खूप कमी असल्यामुळे पाणी उपलब्ध असूनही ते शेतापर्यंत पोहोचण्यास अडचणी निर्माण होतात.

वास्तविक पाटबंधारे महामंडळाच्या अधिनियमानुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील नवीन प्रकल्पांचे बांधकाम, पूर्ण झालेल्या प्रकल्पांची दुरुस्ती, व्यवस्थापन महामंडळांनीच करणे अपेक्षित आहे. मात्र, २००४ मध्ये राज्याने राबविलेल्या महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य घेण्यासाठी बँकेच्या अटीनुसार सिंचन व्यवस्थापनाचे कार्य शासन स्तरावरुन करण्याचे मान्य करण्यात आले होते. आता हा प्रकल्प व बँकेची कर्ज घेण्याची प्रक्रिया २०१४ मध्ये पूर्ण झाली आहे. याशिवाय राज्यात २००५ मध्ये सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ व महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम २००५ लागू करण्यात आले असून यानुसार नदीखोरे अधिकरणासाठी पाटबंधारे महामंडळांना प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार सिंचन व्यवस्थापनाची जबाबदारी महामंडळांना देण्यात आली आहे. तसेच सिंचन प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्ती व आस्थापना खर्चासाठी महामंडळांना संबंधित प्रकल्पातून वसूल होणाऱ्या पाणीपट्टीच्या रक्कमेतून खर्च करण्याची मुभा देण्याचा आज निर्णय घेण्यात आला.

या निर्णयानुसार पाटबंधारे विकास महामंडळांना सर्व प्रकल्पांवर महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ च्या तरतुदीनुसार पाणी वापर संस्थेद्वारे सिंचन

व्यवस्थापन करणे बंधनकारक असेल. यापुढे सिंचन व्यवस्थापन कार्यालयांनी सिंचन प्रकल्पाच्या सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीची रक्कम संबंधित महामंडळाकडे जमा करणे अपेक्षित आहे. तसेच सिंचन पाणीपट्टीतून वसूल झालेली रक्कम महामंडळांनी संबंधित प्रकल्पावरच खर्च करण्याचे बंधन या निर्णयाद्वारे महामंडळांवर असेल. तर बिगर सिंचन पाणीपट्टी जमा होणाऱ्या रक्कमेपैकी ६० टक्के रक्कम राज्यस्तरीय सिंचन कोषामध्ये तर ४० टक्के रक्कम महामंडळ स्तरावर सिंचन प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी खर्च करणे अपेक्षित आहे. तसेच राज्यस्तरीय सिंचन कोषामध्ये सर्व महामंडळांकडून जमा होणाऱ्या रक्कमेचे वितरण पाटबंधारे महामंडळांना त्यांनी स्थापित केलेल्या सिंचन क्षमतेच्या प्रमाणात करण्याच्या दृष्टीने स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात येईल. याशिवाय ज्या सिंचन प्रकल्पांची देखभाल-दुरुस्तीची कामे महामंडळाकडील निधीतून करणे शक्य होणार नाही, अशा कामांसाठी प्रचलित कार्यपद्धतीनुसार महामंडळांना उपलब्ध होणाऱ्या योजनेंतर्गत निधीमधून करण्यात येतील. आज झालेल्या निर्णयामुळे यापुढे सिंचन प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून अर्थसंकल्पात योजनेतर अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

प्रशासकीय सुलभतेसाठी सिंचन व्यवस्थापन आस्थापनांच्या खर्चासाठी आवश्यक अनुदान प्रचलित पद्धतीप्रमाणे शासन स्तरावरुन करण्यात येणार असले तरी त्याचा परतावा महामंडळांना पाणीपट्टीतून उपलब्ध होणाऱ्या रक्कमेतून करायचा आहे. मात्र, याबाबतीत महामंडळे स्वयंनिर्भर होण्यासाठी पाच वर्षांचा कालावधी देण्यात आलेला आहे. यानुसार २०१६-१७ साठी २० टक्के, २०१७-१८ मध्ये ४० टक्के, २०१८-१९ मध्ये ६० टक्के, २०१९-२० मध्ये ८० टक्के तर २०२०-२१ पासून १०० टक्के अशा पद्धतीने महामंडळांना हा परतावा शासनास द्यावा लागणार आहे.

त्याचप्रमाणे बिगर सिंचन पाणी वापरासाठी प्रकल्प नियोजनात तरतूद नसतानाही पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी आरक्षण दिले जाते. त्यावेळी त्याचा परिणाम प्रकल्पीय सिंचनावर होतो. या कमी होणाऱ्या सिंचनाची पुनर्स्थापना करण्यासाठी महापालिका अथवा उद्योजकांकडून सिंचन पुनर्स्थापना खर्च (एक लाख रुपये प्रति हेक्टर) वसूल केला जातो. या खर्चाची रक्कमही शासनाच्या तिजोरीत जमा होत होती. आता ही रक्कम महामंडळाकडे जमा करून ती त्याच प्रकल्पावरील सिंचन क्षेत्राच्या पुनर्स्थापनेसाठी वापरावी लागणार आहे.

आजच्या निर्णयामुळे सिंचन प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती महामंडळास वेळच्या वेळी करणे शक्य होणार आहे. यामुळे पाणी वापराची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष वापर यातील तफावतही दूर होण्यास मदत होणार आहे. वाढत्या बिगर सिंचन वापरामुळे घटलेल्या सिंचन पुनर्स्थापनेची कामे (पाईप वितरण, कालवा अस्तरीकरण इत्यादी उपाययोजनेतून पाणी नाश कमी करून बिगर सिंचन वापराची भरपाई) करणे शक्य होणार आहे. या सर्वांचा फायदा मुख्यत्वे शेतकऱ्यांनाच होणार आहे.

या निर्णयामुळे पाणीपट्टीतून मिळणारी रक्कम आणि सिंचन व्यवस्थापनासाठी दिले जाणारे अनुदान यातील तफावती मुळे होणारा तोटा यापुढे शासनास सहन करावा लागणार नाही. मागील वर्षी शासनास २८८ कोटी रुपये एवढा तोटा सहन करावा लागला होता. हा तोटा मुख्यत: पाणीपट्टीचे दर सुधारित न केल्याने झाला होता. आज घेण्यात आलेल्या निर्णयामुळे या समस्यांवर उपाय काढणे शक्य होणार आहे.

-------------------

जलसंपदा विभाग

## राज्यस्तरीय सिंचन प्रकल्पांच्या व्याप्तीतील बदलाबाबतच्या धोरणात सुधारणा

राज्यस्तरीय सिंचन प्रकल्पांच्या (२५० हेक्टर क्षेत्रावरील) व्याप्ती बदलाबाबतच्या धोरणात सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. प्रकल्पाशी संबंधित साठा, वापर, पीकरचना वाटप, मुख्य कालव्याची लांबी आदी बाबींमुळे सिंचन लाभक्षेत्रात १० टक्क्यापेक्षा अधिक वाढ, प्रकल्पीय उपयक्त पाणी साठ्यात एक टक्क्यापेक्षा अधिक वाढ, मंजूर प्रकल्पाच्या बांधकाम घटकांवरील प्रत्यक्ष खर्चात वास्तविक किंमतीपेक्षा १५ टक्क्यांहून अधिक किंमतवाढ या कारणांमुळे प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाला असे या धोरणानुसार समजण्यात येणार असून त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक ठरणार आहे.

प्रगतीपथावर कामे असलेल्या राज्यातील सिंचन प्रकल्पांच्या व्याप्तीत बदल झाल्यानंतर त्यांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येते. ही बाब नवीन प्रकल्पाला मंजूरी दिल्यासारखेच असल्याचे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने निदर्शनास आणले होते. या मान्यतेमुळे राज्यपालांनी मार्च-२०१२ मध्ये दिलेल्या निधीवाटपाबाबतच्या निदेशांना अनुसरून नसल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले होते. त्यामुळे अशा प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत असे आदेशही या निर्देशात देण्यात आले होते. त्यानंतर जून-२०१३ मध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार जलसिंचन प्रकल्पांच्या व्याप्तीतील बदलाबाबतची तत्त्वे निश्चित करण्यात आली. गेल्या तीन वर्षात त्यानुसार अंमलबजावणी करताना आलेले अनुभव लक्षात घेऊन त्यात पुन्हा बदल करण्याची गरज भासू लागली होती. त्यामुळे याबाबतच्या धोरणात सुधारणा करण्यात याव्यात असे निर्देश सप्टेंबर २०१५ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने दिले होते. त्यानुसार आज झालेल्या बैठकीत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या धोरणानुसार पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेच्या अहवालात प्रकल्पाचा पाणीसाठा, पाण्याचा वापर, पीक रचना, पाणी वाटप व मुख्य कालव्याची लांबी आदी बाबींमध्ये बदलामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात १० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त वाढ होणार असल्यास प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाला असे समजण्यात येईल. प्रकल्पातील धरणांच्या नियंत्रक पातळ्या, क्षेत्रफळ-क्षमता आलेख आदी बाबींच्या बदलामुळे प्रकल्पातील उपयुक्त पाणी साठ्यात एक टक्का किंवा त्यापेक्षा जास्त वाढ होणार असल्यास व्याप्तीत बदल झाला असे समजण्यात येईल. प्रकल्पाच्या बांधकाम घटकांवरील प्रत्यक्ष खर्चात अभियांत्रिकी स्वरुपाच्या बदलांमुळे वास्तविक किंमतीपेक्षा १५ टक्क्यांहून अधिक किंमत वाढ संभवत असल्यास प्रकल्पाच्या व्याप्तीत बदल झाला असे समजण्यात येईल.

याशिवाय प्रकल्प बांधकामाची अंमलबजावणीही मुळ प्रशासकीय मान्यता किंवा अद्ययावत सुधारित प्रशासकीय मान्यता ही प्रकल्पाच्या प्रमुख वैशिष्ट्यांशी अनुरूप असणे गरजेचे आहे. प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक असून त्याशिवाय मंजूर प्रकल्प अहवालाच्या व्याप्तीच्या बाहेरील घटकांवर आर्थिक दायित्व निर्माण करता येणार नाही. वाढीव व्याप्तीतील कामे स्थगित ठेवावी लागणार असून अपवादात्मक परिस्थितीत स्थगित ठेवणे

शक्य नसल्यास सक्षम प्राधिकरणाकडून ही कामे सेफ स्टेजला आणण्यासाठी मान्यता घ्यावी लागणार आहे.

अपवादात्मक परिस्थितीत मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालात अभियांत्रिकी बदल करुन बांधकाम चालू ठेवण्यास अनुमती देण्याचे अधिकार आवश्यक तपशिलासह सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत सादर करणे आवश्यक आहे. या प्राधिकाऱ्याने बदलांबाबत राज्य तांत्रिक सल्लागार समितीचे अभिप्राय विचारात घेऊन निर्णय घ्यावा. जलवैज्ञानिक तपासणीअंती असफल ठरणाऱ्या प्रकल्पाच्या वाढीव व्याप्तीतील कार्यान्वित न झालेल्या प्रकल्प घटकांबाबत प्रकल्पनिहाय गुणवत्तेवर आधारित निर्णय घेण्यासाठी राज्य तांत्रिक सल्लागार समितीचा अभिप्राय घेऊन मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करावा लागेल.

यापुर्वी व्याप्तीबद्दल झालेल्या प्रकल्पांवरील आर्थिक गुंतवणुकीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे त्यानुसार प्रकल्प अथवा त्याअंतर्गत बांधकाम सुरू असलेल्या उपघटकाचे काम पूर्णत्वाचे कोणत्या टप्प्यावर आहे याचा आढावा घेऊन त्यानुसार प्रकल्पाचा अग्रक्रम ठरविण्यात येईल. ज्या प्रकल्पापासून पुढील तीन वर्षात प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकेल अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येईल. असे करताना मूळ प्रकल्प अहवालातील घोषित लाभक्षेत्रास सिंचनाचे लाभ देणाऱ्या घटकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यानंतर जलवैज्ञानिक तपासणीत सफल ठरलेल्या प्रकल्पाच्या वाढीव व्याप्तीतील घटक विचारात घेतले जाणार आहेत. मात्र, सिंचन अनुशेष असलेल्या जिल्ह्यांसाठी हा अनुशेष लागू राहणार नाही.

राज्य तांत्रिक सल्लागार समितीने प्रकल्पाचे सर्वेक्षण, संकल्पन, संरेखा, अंदाजपत्रक याबाबतच्या क्षेत्रीय निर्णयांची सखोल तांत्रिक तपासणी प्रस्तावित केल्यास किंवा प्रकल्पाच्या किंमतवाढी बाबतच्या एखाद्या निर्णयाचे तांत्रिक परिक्षण करणे आवश्यक असल्याचे संबंधित प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्याबाबतच्या निर्देशांच्या अधिन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येणार आहे. प्रवाही सिंचनाऐवजी उपसा सिंचन योजना तसेच शासन खर्चाने ठिबक अथवा तुषार पध्दतीचा अवलंब करण्यापूर्वी सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

व्याप्ती बदल नसलेल्या आणि सक्षम प्राधिकरणाकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या प्रकल्पांच्या प्रकरणात सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहून उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत खर्च करण्यास मान्यता देण्याचा अधिकार आंतरवित्त सल्लागाराच्या सहमतीने जलसंपदा विभागास असतील.

मंत्रिमंडळाच्या आजच्या निर्णयामुळे प्रगतीपथावर असलेल्या सिंचन प्रकल्पाबाबत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया जलदगतीने होणार आहे. सिंचन प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात आर्थिक शिस्त येऊन प्रकल्प खर्चातील वाढीवर नियंत्रण येणार आहे. तसेच निधी वाटपावर नियंत्रण आल्याने अंतिम टप्प्यातील प्रकल्प लवकरच पूर्ण होतील.

-----o-----

## सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्त्वावर
## १४ जिल्ह्यांत सघन कुक्कुट विकास गट

राज्यातील कुक्कुटपालनास चालना देण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर १४ जिल्ह्यांमध्ये सघन कुक्कुट विकास गटाची (Intensive Poultry Development Blocks) स्थापना करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

सध्या १६ जिल्ह्यांत सघन कुक्कुट विकास गट कार्यरत आहेत. आजच्या निर्णयामुळे १४ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे २८ गटांची स्थापना करण्यात येणार असून अनुदान आणि प्रशिक्षण यासाठी ५१ कोटी १४ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. शासनाकडील सघन कुक्कुट विकास गटातील व्यवस्थापन खर्च जास्त असल्यामुळे राज्यात नवीन गट स्थापण्यासाठी सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्त्वावरील प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. यानुसार सिंधुदुर्ग, ठाणे, जळगाव, नंदूरबार, हिंगोली, चंद्रपूर, वाशिम, लातूर, जालना, बुलडाणा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा आणि भंडारा या जिल्ह्यांमध्ये स्थापण्यात येणाऱ्या प्रत्येक गटावर दोन हजार पक्ष्यांचा पायाभूत कळप ठेवण्यास मंजुरी देण्यात आली. या कुक्कुट प्रकल्पांमध्ये देशी कोंबड्यासारखे दिसणारे रंगीत व रोगप्रतिकारक क्षमता असलेले गिरीराज, वनराज, सातपुडा, सुवर्णधारा, ग्रामप्रिया यासारखे सेंट्रल रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेने संशोधित केलेल्या लो इनपूट टेक्नॉलॉजीच्या सहाय्याने सुधारित पक्ष्यांचे संगोपन केले जाईल.

राज्य शासनाकडून पायाभूत कळप संगोपन करण्यासाठी २ पक्षीगृहांचे बांधकाम, स्टोअर रूम, पाण्याची टाकी, विद्युतीकरण, खाद्य व पाण्याची भांडी, ब्रुडर, इतर उपकरणे व लसीकरण तसेच ४०० उबवणुकीची अंडी, २० आठवडे वयाचे ५०० अंड्यावरील पक्षी, एकदिवसीय एक हजार पिले, पक्षी खाद्य ग्राईंडर आणि एग नेस्ट्स यांच्या खरेदीसाठी सर्वसाधारण व्यक्तीस ५० टक्के आणि अनुसूचित जाती-जमातीतील व्यक्तीस ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत उत्पादित होणारी उबवणुकीची अंडी एनईसीसी (National Egg Coordination committee) च्या खाण्यासाठीच्या अंड्यांच्या प्रचलित दराच्या अडीच पट दराने खरेदी करण्यात येणार आहेत. तसेच एकदिवसीय पिले, तलंगा, नर कोंबडे व कल्स यांची सीपीडीओ (Central Poultry Development Organisation, Mumbai) आणि पशुसंवर्धन विभागामार्फत निश्चित करण्यात आलेल्या दराने खरेदी होणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना उत्पादनाच्या विक्रीची हमी मिळणार आहे.

या गटांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी तथा पशुपालक, महिला स्वयंसहाय्यता गट, सुशिक्षित बेरोजगार यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच गाव पातळीवरील छोट्या कुक्कुट व्यावसायिकांना आणि परसातील कुक्कुटपालनासाठी सहजगत्या एक दिवसीय कुक्कुट पक्षी उपलब्ध होतील. उत्पादित अंडी व पक्ष्यांच्या विक्रीतून व्यावसायिकांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होणार असून त्यांच्यासाठी शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण होणार आहे. या योजनेमुळे दैनंदिन आहारात प्रथिनयुक्त आहाराचा समावेश होऊन कुपोषणावर मात होण्यास मदत होईल. भविष्यात कुक्कुट मांसास वाढती मागणी राहणार असून या योजनेमुळे मांसाची मागणी व पुरवठा यामधील तफावत दूर करणे शक्य होणार आहे. विविध केंद्र पुरस्कृत, राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय योजनांसाठी हे प्रकल्प मातृसंस्था म्हणून काम पाहू शकतील व त्यासाठी नव्याने गुंतवणूक करावी

लागणार नाही. त्यामुळे या प्रकल्पांना विविध योजनांसाठी उबवणुकीची अंडी, एकदिवसीय पिल्ले, तलंगा व नर वाटपासाठी अधिक वाव राहील. याव्यतिरिक्त लाभार्थ्यास नर कोंबडे, तलंगांची विक्री, रिकामी पोती, पोल्ट्री मॅन्यूअर व ७२ आठवड्यानंतरचे कल्ड पक्ष्यांची विक्री यामधून देखील उत्पन्न मिळणार आहे.

या योजनेंतर्गत संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सहा सदस्यांच्या समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. एकूण २८ लाभार्थ्यांपैकी अनुसूचित जातीचे-४, अनुसूचित जमातीचे-२ आणि महिला लाभार्थी-८ असे प्रमाण असू शकते. निवडलेल्या लाभार्थ्यांना कुक्कुटपालन विषयक ५ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

---------------------

ग्रामविकास विभाग

**गावांच्या शाश्वत विकासासाठी**
**'स्मार्ट ग्राम' योजनेस मान्यता**

राज्यातील गावांचा शाश्वत विकास घडविण्याबरोबरच पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने राज्यात समृद्ध ग्राम योजना राबविण्यात येत होती. ही योजना अधिक लोकाभिमुख करण्यासाठी राज्यातील सर्व भागातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा विचार करून तिच्या निकषांत आणि स्वरूपात बदल करून तिचे रूपांतर 'स्मार्ट ग्राम' योजनेत करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. ही योजना २०१६-१७ या वर्षापासून राबविण्यात येणार आहे.

स्मार्ट ग्राम योजनेंतर्गत राज्यातील सर्व गावांना या योजनेत सहभागाची समान संधी मिळणार असून त्यांना विकासासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांचा प्रचार-प्रसार करणे, गावागावात निकोप स्पर्धा होऊन स्वच्छता, पर्यावरण आरोग्याविषयी जागृती करणे अशा माध्यमातून ग्रामपंचायतींना स्वयंवृद्धीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. ग्रामविकास मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती या योजनेची अंमलबजावणी आणि सनियंत्रण करणार आहे.

'स्मार्ट ग्राम' योजनेसाठी विविध निकष निश्चित करण्यात आले असून योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेच्या माध्यमातून तालुका आणि त्यातून निवडलेल्या गावांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत स्थानिक, तालुका आणि जिल्हा स्तरावर देखरेख समिती व राज्यस्तरीय सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात येणार आहे. योजनेसाठी या वर्षी ४०.२० कोटी रूपयांची तर पुढील प्रत्येक वर्षासाठी ५३.८० कोटी इतका खर्च करण्यात येणार आहे. तालुकास्तरावरील विजेत्या स्मार्ट गावांना २६ जानेवारीला तर जिल्हास्तरावरील विजेत्या स्मार्ट गावांना १ मे रोजी रोख स्वरूपात बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. गावांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी बक्षिसांची रक्कम खर्च करणे बंधनकारक आहे.

--------------------------

नगरविकास विभाग

**महानगरपालिका क्षेत्रांमध्ये**
**महिलांसाठी तेजस्विनी बस**

राज्यातील शहरी भागामध्ये नोकरी-व्यवसायासाठी प्रवास करणाऱ्या महिलांची वाढती संख्या आणि अपुऱ्या बसेसच्या फेऱ्यांमुळे होणाऱ्या त्रासापासून त्यांची सुटका करण्याच्या उद्देशाने राज्यातील पाच महानगरपालिका क्षेत्रांमध्ये खास महिला प्रवाशांसाठी तेजस्विनी बस सेवा सुरु करण्यास आज मंत्रिमडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

महिला सुरक्षिततेबाबत राज्याचे प्राधान्य लक्षात घेऊन मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नागपूर या महानगरपालिका क्षेत्रामध्ये सार्वजनिक बस वाहतुकीच्या माध्यमातून महिलांसाठी ३०० तेजस्विनी बसेस शासनातर्फे देण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यामध्ये सध्या २७ महानगरपालिका असून यापैकी काही महानगरपालिकांची स्वत:ची वाहतूक व्यवस्था आहे. परंतु अपुऱ्या बसेसच्या फेऱ्या आणि वेगाने वाढणारी नागरी भागातील लोकसंख्या यामुळे नोकरी व्यवसायासाठी जाणाऱ्या महिला प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागतो. कित्येकदा रांगेत ताटकळत उभे रहावे लागते हे लक्षात घेऊन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिका क्षेत्रामध्ये तेजस्विनी बस या नावाने महिलांसाठी स्वतंत्र बस सुरु करण्याची घोषणा राज्य सरकारतर्फे करण्यात आली होती.

या घोषणेची पूर्तता करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक बस वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांसाठी ३०० तेजस्विनी बसेस शासनातर्फे देण्यात येणार असून त्यासाठी २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी ५० कोटी रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत ३०० बसेस खरेदी करण्यासाठी अंदाजे ९० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. यासाठी शासन स्तरावरुन १०० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

या योजनेंर्तगत सकाळी ७ ते ११ तसेच सायंकाळी ५ ते रात्री ९ या कालावधीत सुटणाऱ्या बसेसमधील १०० टक्के आसने महिलांसाठी आरक्षित असतील. तसेच या बसेससाठी तिकीटाचे दर संबंधित महानगरपालिका क्षेत्रातील प्रचलित तिकीट दरानुसार असतील. तथापि तिकीटाचे दर, आसन व्यवस्था, बसेसच्या वेळा यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार बदल करण्याचे अधिकार संबंधित महानगरपालिकेला असतील. या योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या बसेस पर्यावरणपूरक असणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच या बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, टीव्ही, सार्वजनिक उद्घोषणा यंत्रणा बसविणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र शासन तेजस्विनी बस असा उल्लेख असलेल्या या बसेसमध्ये प्रामुख्याने महिला चालक व वाहकांच्या सेवा देण्यात येतील.

-------------------